ग्रंथमालिका ‘गुरु’ : खंड ३

# गुरूंचे वागणे, कार्य आणि गुरुपरंपरा

मराठी (Marathi)

संकलक

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**

**सनातन संस्था**

ऑगस्ट २०२३ पर्यंत सनातनच्या ३६२ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९४ लाख १८ सहस्र प्रती !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून ८.७.२०२३ पर्यंत १२५ साधक संत झाले, तर १,०४० साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## प्रस्तुत ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


| | | |
|---|---|---|
| **१.** | **शिष्याला ज्ञान देण्याच्या दृष्टीने गुरूंचे महत्त्व** | ८ |
| **२.** | **गुरूंचे वागणे** | ८ |
| | २ अ. सर्वसाधारण वागणे    २ आ. संतांशी वागणे | ८ |
| **३.** | **गुरूंचे कार्य** | २९ |
| | ३ अ. अध्यात्मप्रसार | २९ |
| | ३ आ. गुरु खरंच काही करतात का ? | ३४ |
| **४.** | **भंडारा** | ४० |
| | ४ अ. अन्नदान    ४ आ. सेवा | ४० |
| | ४ इ. त्याग    ४ ई. दुसऱ्यांविषयी प्रेम वाटणे | ४० |
| | ४ ऊ. सत्संग | ४१ |
| **५.** | **भ्रमण** | ४१ |
| | ५ अ. उद्देश    ५ आ. शिष्याला होणारे लाभ | ४१ |
| **६.** | **तीर्थयात्रा** | ४४ |
| **७.** | **गुरु आणि इतर** | ४५ |

७ अ. गुरु आणि गुरूंचे कुटुंबीय ७ आ. शिक्षक आणि गुरु ४५
७ इ. प्रवचनकार आणि गुरु ४९
७ उ. सर्वसाधारण व्यक्ती, साधक आणि गुरु ५०
७ ऊ. संत आणि गुरु ७ ऐ. ईश्वर आणि गुरु ५०
**८. गुरूंना बुद्धीने जाणून घेणे अशक्य असल्याची कारणे ५९**
**९. गुरूंची इतर गुरूंशी तुलना केल्याने साधनेत उन्नती न होणे ६०**
**१०. गुरूंच्या दृष्टीकोनातून गुरु ! ६३**
१० अ. गुरु कोणाला गुरुपदावर बसवतात ? ६३
१० आ. स्वतःच्या गुरुपदाविषयी विचार ६४
१० ई. स्वतःच्या बोलण्याविषयी विचार ६५
१० उ. आशीर्वाद देतांनाचा भाव ६५
१० ऊ. गुरूंचा शिष्यभाव ६५
१० ए. गुरु-शिष्य नात्याविषयी दृष्टीकोन ६५
१० ऐ. गुरूंच्या दृष्टीने गुरुपौर्णिमा ६६
१० ओ. गुरुपणाचे दायित्व ६६
**११. गुरुपरंपरा ६७**
**१२. गुरूंची गादी आणि गुरुपादुका ६९**
**१३. गुरूंची संख्या आणि भारताचे महत्त्व ७०**
**१४. गुरुकृपायोगाची इतर योगमार्गांशी तुलना ७१**
**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ७५**
**卐 गुरूंविषयी टीका वा अयोग्य विचार आणि त्यांचे खंडण ! ७६**
**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन ७७**

## ग्रंथाचे मनोगत

'ज्ञानियांचा राजा गुरु महाराज', असे संत ज्ञानदेवांनी म्हटले आहे. ज्ञान देतात, ते गुरु ! शिळेपासून शिल्प बनू शकते; पण त्यासाठी शिल्पकार लागतो. त्याचप्रमाणे साधक आणि शिष्य ईश्वराला प्राप्त करू शकतात; पण त्यासाठी गुरूंची आवश्यकता असते. गुरूंनी आपल्या बोधामृताने साधक आणि शिष्य यांचे अज्ञान दूर केल्यावरच त्यांना ईश्वरप्राप्ती होते.

साधक आणि शिष्य यांनी साधना करतांना त्यांनी काय केले पाहिजे, काय त्यागले पाहिजे आदीची जाणीव गुरु करून देतात. केवळ उपदेशातूनच नव्हे, तर सर्वसाधारण वाटणाऱ्या वागण्या-बोलण्यातूनही गुरु बरंच काही शिकवतात. साधक आणि शिष्य यांना गुरूंच्या वागण्या-बोलण्याचा भावार्थ न कळल्यास ते गुरूंच्या अमूल्य विचारधनाला मुकतात. प्रस्तुत ग्रंथात गुरूंच्या वागण्याविषयीचा (उदा. गुरूंचे सर्वसाधारण बोलणे, गुरूंचे ओरडणे) आणि ते शिष्याला करत असलेल्या साहाय्या-विषयीचा उहापोह केला आहे.

शिक्षक, देवता अन् गुरु यांत कोणता भेद आहे ? गुरु त्यांच्यानंतर कोणाला गुरुपदावर बसवतात ? 'भारत' हा जगाचा 'आध्यात्मिक गुरु' का आहे ? आदीचाही या ग्रंथात ऊहापोह केला आहे.

'देवा तूची गणेशु । सकल मती प्रकाशु ।।', अशी संत ज्ञानदेवांनी प्रार्थना केली आहे. देवासमान अशा श्री गुरूंनी शिष्याची मती प्रकाशमान केल्याविना शिष्याला गुरूंकडून ज्ञान ग्रहण करणे किंवा शिकणे शक्य होईल का ?

'या ग्रंथाद्वारे जिज्ञासू, साधक आणि शिष्य यांना साधनेसाठी आवश्यक ज्ञान चांगल्या प्रकारे आत्मसात करता येवो आणि त्यांचा प्रवास शीघ्रतेने ईश्वरप्राप्तीच्या दिशेने होवो', अशी श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**